पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ७८

<u>सभावृत्तांत</u>

दिनांक - १७/०९/२०१३ वेळ - सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १७/०९/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.जगदीश शेट्टी
८) मा.भालेकर अरुणा दिलीप
९) मा.वाघेरे सुनिता राजेश
१०) मा.महेशदादा किसन लांडगे
११) मा.बारणे माया संतोष
१२) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१३) मा.कदम सदगुरु महादेव
१४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१५) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.श्रीकर परदेशी – मा.आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.माछरे, मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे – नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.भोसले – मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.डॉ.देशमुख – प्र.वैद्यकिय अधिक्षक, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.निकम, मा.दुधेकर, मा.काची, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.चव्हाण, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.सय्यद, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.उल्हास जगताप – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्र. ४१) ससुन रुग्णालयासाठी औषधे लोन बेसिसवर उपलब्ध करणेबाबत..मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४२) तरतुद वर्ग करणेबाबत..मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२०३४ दि.१/१२/२०१२ मध्ये दुरुस्ती करणेबाबत..मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४४) ब प्रभागातील सन २०१३ - १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ घट करणेबाबत.. मा.शकुंतला धराडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४५) तरतुद वर्ग करणेबाबत.. मा.अरुणा भालेकर, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४६) सन २०१३ - १४ चे अंदाजपत्रकात तरतुद वर्ग करणेबाबत..मा.शकुंतला धराडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४७) मा.स्थायी समिती ठराव क्र.३९२७ दि.२७/०८/२०१३ रद्द करणेबाबत..मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्र.४८) मनपाचे विविध विभागांसाठी एच.पी.कं.चे टोनर खरेदीबाबत..

विषय क्र.४९) तरतुद वर्ग करणेबाबत..

विषय क्र.५०) क प्रभाग तरतुद वाढ/घट करावयाचे कामाबाबत..

विषय क्र.५१) डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरविणेबाबत..

विषय क्र.५२) अ प्रभागातील सन २०१३ - १४ चा मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक विकास कामाच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत..

विषय क्र.५३) तरतुद वर्ग करणेबाबत..मा.चंद्रकांत वाळके,

विषय क्र.५४) मनपा नगरसदस्य यांना मानधन वाढ होणेबाबत..मा.चंद्रकांत वाळके

विषय क्र.५५) मनपाचे दवाखान्यांमध्ये सि.सि.टि.व्ही. सर्व्हेलन्स यंत्रणा उभारणेबाबत..

-----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.चंद्रकांत वाळके | अनुमोदक - मा.सुनिता वाघेरे

शहरातील पाणीपुरवठा सुनिश्चीत व सुरळीत नाही तो सुरळित होणेकामी सदरची सभा शनिवार दि.२१/०९/२०१३ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती** :- शनिवार दिनांक २१/०९/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – ७८

सभावृत्तांत

( दिनांक १७/०९/२०१३ ची दुपारी ११.०० ची तहकुब सभा)

दिनांक - २१/०९/२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक १७/०९/२०१३ ची तहकुब सभा शनिवार, दिनांक २१/०९/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.भालेकर अरुणा दिलीप
८) मा.वाघेरे सुनिता राजेश
९)मा.महेशदादा किसन लांडगे
१०)मा.बारणे माया संतोष
११)मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१२)मा.लोंढे गणेश नारायण
१३)मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१४)मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.श्रीकर परदेशी – मा.आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.माछरे, मा.फुंदे, मा.माने – सहा.आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे – नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.भोसले – मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.पवन साळवे – अति.वैद्य.अधिकारी, मा.भगत – उप वैद्यकिय अधिक्षक, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.काची, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.चव्हाण, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.थोरात, मा.साळवी, मा.लडकत, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.सय्यद, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.उबाळे – प्रशासन अधिकारी ( शिक्षण मंडळ), मा.साळुंके – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.किरण गावडे – अग्निशामक अधिकारी, मा.इंदलकर – जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

दिनांक १०/९/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक - ७७**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ४१०४ विषय क्रमांक – १

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.सौ.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. पापु/६/कावि/७०२/२०१३दि.५/८/२०१३

विषय :- निविदा नोटीस क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.१९ मधील कामाचा करारनामा करणेबाबत..

विषय क्रमांक १ चे कामाच्या फेरनिविदा काढणेत याव्यात..

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०५ विषय क्रमांक – २

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/८/कावि/४००/२०१३दि.१६/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नविन प्रभाग कार्यालय व माध्यमिक विद्यालय तसेच सार्वजनिक वाचनालय यांना आवश्यक फर्निचर खरेदीकामी पुरेशी तरतुद उपलब्ध असणे आवश्यक आहे. परंतु वरिल कामाच्या निविदा प्रसिध्द केल्या असुन नविन प्रभाग कार्यालायाकरिता व माध्यमिक विद्यालयाकरिता आवश्यक फर्निचर खरेदकामी तरतुद उपलब्ध नाही. तरी भांडार विभागाकडील विद्युत साहित्य खरेदी या लेखाशिर्षावरिल उपलब्ध तरतुद रक्कम रु ४,००,००,०००/- मधुन रक्कम रु ५०,००,०००/-तरतुद वर्ग करता येईल विद्युत विभागासाठी साहित्य खरेदीकामी सद्यस्थिती र.रु.१,२४,६०,३००/-कामे प्रस्तावीत आहे. “विद्युत साहित्य खरेदी” या लेखाशिर्षावरिल तरतुद शिल्लक राहण्याची शक्यता आहे. तरी तुर्त “विद्युत साहित्य खरेदी” या लेखाशिर्षावरिल र.रु.५० लाख “फर्निचर सामान खरेदी” या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०६ विषय क्रमांक – ३

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मभां/५/कावि/६२६/२०१३दि.१७/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे ना.सु.केंद्र मुख्य कार्यालय,चार प्रभाग कार्यालय,झोनिपू व नव्याने १५ ठिकाणी नागरी सुविधा केंद्रांमध्ये आवश्यक सॉप्टवेअर कार्यान्वीत करणेसाठी ई–निविदा क्र.३९-५/२०१२-१३ अन्वये लघूतम निविदाकार मे.प्रोबिटी सॉप्ट प्रा.लि.पुणे-४५ यांचे एकूण ३ बाबींसाठी अ.क्र.१ मधील बाब क्र.१) A Multi-Services integrated CFC Solution 1.CFC Application for PCMC Services Including साहित्याचे दर एकूण र.रु.१७,००,०००/-, अ.क्र.२ मधील बाब क्र.B चे Integration Services साहित्याचे दर एकूण र.रु.१५,००,०००/- व अ.क्र.३ मधील बाब क्र.सी.चे Other Services साहित्याचे दर एकूण

र.रु.२,५०,०००/- असे एकत्रित एकूण र.रु.३४,५०,०००/- (र.रू.चौतीस लाख पन्नास हजार) दर स्विकृत करून करारनामा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०७ विषय क्रमांक – ४

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – ब प्रभाग स्थापत्य

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.जगदीश शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.बप्र/स्था/काअ/२/५५/२०१३दि.२८/८/२०१३

विषय :- ब प्रभागातील सन २०१३ - १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदींमध्ये वाढ - घट करणेबाबत..

विषय क्रमांक ४ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०८ विषय क्रमांक – ५

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – अग्निशामक

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.अग्नि/१/कावि/२४५/२०१३दि.१०/७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशामक विभागांतर्गत आपत्ती व्यवस्थापन “मुख्यसमन्वय” यापदाचे कामकाजाकरीता खालील निवड यादीतील उमेदवारांस त्यांचे नावापुढे नमुद केलेल्या एकत्रित मानधनावर अकरा महिने कालावधीसाठी तात्पुरती स्वरुपाचे नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

| | उमेदवाराचे नाव | पदनाम | प्रतिमहा एकत्रित मानधन र.रु. |
|---|---|---|---|
| १ | श्री.ओमप्रकाश किसनराव बहिवाल | मुख्यसमन्वय | ३५,०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१०९ विषय क्रमांक – ६

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – वाहतुक नियोजन कक्ष

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.स्था/वा.क/कावि/१४६/२०१३दि.३१/७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.शहर सुधारणा समिती सभा दिनांक २६/०८/२०१३ ठराव क्र.२७ नुसार, पुणे शहर वाहतूक पोलिसांनी केलेल्या मागणीनुसार पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील नियोजित बी.आर.टी. मार्गातून अवैधपणे / अनधिकृतपणे संचलन करणा-या शहरातील इतर रस्त्यावर ‘नो पार्कींग’ झोनमध्ये उभी राहणारी व शहरात इतर ठिकाणी अवैध पार्कींग करुन वाहतूकीचे सुरळीत संचलनात अडथळा ठरणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करणेस व त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावती पुस्तकाद्वारे वसूल करुन त्यातील ५० टक्के रक्कम वाहतूक

पोलिसांना वाहतूकीचे साहित्य खरेदी इ.साठी ठेवून उर्वरित ५० टक्के रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा वाहतूक पोलिसांनी करावा. सदर प्रस्तावानुसार मनपा रस्त्यावर अवैध पार्कींग करणा-या व ' नो पार्कींग ' मध्ये उभ्या राहणा-या आणि बी.आर.टी. मार्गामधून अनधिकृतपणे संचलन करणा-या सर्व प्रकारच्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी आणि त्यापोटी सदर वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क खालीलप्रमाणे आकारणेत यावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | विमोचन व प्रशासकीय शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अवजड वाहने ट्रक, बस, ट्रेलर्स इ. | ५,०००/- |
| २ | रोड रोलर, इतर यंत्र सामुग्री | ३,०००/- |
| ३ | हलकी वाहने १० टनापर्यंत क्षमता | २,५००/- |
| ४ | कार, जीप इ. | २,०००/- |
| ५ | सहा आसनी रिक्षा, टेम्पो इ. | १,५००/- |
| ६ | स्वयंचलित दुचाकी वाहने | १,०००/- |

उपरोक्त प्रमाणे वाहनधारकांकडून विमोचन व प्रशासकीय शुल्क मनपाच्या पावतीपुस्तकाद्वारे वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २०८ अन्वये मनपाचे अधिकार वाहतूक पोलिसांना प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११० विषय क्रमांक – ७

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – वैद्यकीय मुख्य

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.माया बारणे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/०८/कावि/२१४/२०१३दि.३१/०८/२०१३

विषय :- स्थायी आस्थापना लेखाशिर्षातुन "गणवेश शिलाई" या लेखा शिर्षावर तरतुद वर्ग करणेबाबत..

विषय क्रमांक ७ चा विचार दिनांक ८/१०/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१११ विषय क्रमांक – ८

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पापु/नि/कावि/७८७/२०१३दि.२/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.६/४२/२०१२-१३ मधील अ.क्र.१३ अन्वये, जलक्षेत्र क्र.३/१३ दापोडी येथे पाण्याचे टाकीचे आवारात ५ ल.लि. क्षमतेची संपवेल बांधणेकामी मे.मंगलदास इन्फ्राटेक प्रा.लि. (नि.र.रू. २५,८३,३४१/- पेक्षा ६.१० % जादा (चालू दराशी तुलना करता १५.७८% ने कमी) (भाव वाढ फरक कलमासह) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११२ विषय क्रमांक – ९
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र
सुचक – मा.जगदीश शेट्टी अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.जशुके/वि/०४/६०/२०१३दि.२७/०८/२०१३
विषय :- तरतुद वर्गीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११३ विषय क्रमांक – १०
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – पाणीपुरवठा
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.पापु/नि/कावि/७९४/२०१३दि.३/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१३-१४ मधील अ.क्र.०१ अन्वये, निगडी से.२३ जलशुध्दीकरण केंद्रासाठी आवश्यक असणारे द्रवरूप पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड ९४१.४० मे.टन मे.एस.व्ही.एस.केमिकल कॉर्पोरेशन यांचेकडून व ६२७.६० मे.टन मे.केमिकल पीपल यांचेकडून र.रू.१२,६०० प्र.मे.टन या दराने खरेदी करणेकामी त्यांचेशी करारनामा करणेस व सदर खरेदीसाठी येणारा खर्च र.रू.१,९७,६९,४००/- यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११४ विषय क्रमांक – ११
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – विद्युत
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. वि/मुका/३२५/२०१३दि.४/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील पृष्ठ क्र.१३ वरील स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षामधील पृष्ठ क्र.३३ अ.क्र.१४ वाहतुक सुधारणा विषयक कामे करणे व पार्कींग जागा ह्या १ ते १४४ कामांच्या यादीत नाशिक फाटा उड्डानपुलाच्या सुशोभिकरणासाठी एल.ई.डी. दिवे वापरून प्रकाश व्यवस्था करणे या कामाच्या नावाचे स्वतंत्र उपलेखाशिर्ष निर्माण करुन पृष्ठ क्र.४७, अ.क्र.१२६ येथील नाशीकफाटा उड्डाणपुल येथे पादचा-यांसाठी FOB व इतर अनुषंगीक कामे करणे या कामासाठी केलेल्या र.रु. ८ कोटी या तरतुदीमधुन र.रु.६२ लाख इतकी तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११५ विषय क्रमांक – १२
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – ड प्रभाग विद्युत
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.डप्र/वि/१/कावि/४७४/२०१३दि.३१/०८/२०१३
विषय :- विद्युत ड प्रभाग कार्यक्षेत्रातील चालु पुर्ण तथापि मनपा अंदाजपत्रक सन २०१३ – १४ मध्ये समाविष्ट असलेल्या लेखाशिर्ष निहाय कामांसाठी विभागांतर्गत तरतुद र.रु.९३,००,०००/-

वर्गीकरण करणेस मान्यता मिळणेबाबत..

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११६ विषय क्रमांक – १३
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मसाभां/४/कावि/४७८/२०१३दि.३१/८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तालेरा रुग्णालयाकरीता व वाय.सी.एम.रुग्णालयाकरीता आवश्यक लागणारे A-Scan Machine व Portable ECG Machine खरेदी करणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई-निविदा क्र. ०२/२०१२-१३ मधील प्राप्त लघुत्तम दरानुसार १ नग A-Scan Machine मे. मनाली एन्टरप्रायजेस यांचेकडून र.रु. २,६६,१४२/- प्रतिनग व वाय.सी.एम. व इतर रुग्णालयांकरीता आवश्यक लागणारे ५ नग Portable ECG Machineमे. एस.बी.एन्टरप्रायजेस यांचेकडून र.रु. २६,१४०/- प्रतिनग या दराने र.रु. १,३०,७००/- असा एकूण मिळून र.रु. ३,९६,८४२/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११७ विषय क्रमांक – १४
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान विद्युत
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.उद्यान/वि/४४/२०१३दि.७/०९/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा विद्युत विभागाकडील सेक्टर १६, राजे शिवाजीनगर गणपती मंदिराजवळ, प्राधिकरण चिखली ४१२११४ (थ्री फेज) विज मीटर घेणेकामी करारनामा न करता र.रू.५,४१९/- दि.१५/०५/२०१३ अन्वये र.रू५,४१९/- (अक्षरी र.रू.पाच हजार चारशे एकोणीस फक्त) म.रा.वि.वि.कं.मर्या. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११८ विषय क्रमांक – १५
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.नरवि/कावि/आ १/७१०/२०१३दि.५/९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नगररचना व विकास विभागाकडील जाहीरात क्र.१७४ चे बिल दै इंडियन एक्सप्रेस यांना र.रू.१,४७,३३९/- इतके देय असुन त्यांना यापूर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र.१३१०२ दिनांक १४/१/२०११ च्या मान्यतेने व नगररचना व विकास विभागाच्या आदेश क्र. नरवि/कावि/४अ४/१२/२०११, दि. ८/२/२०११ अन्वये त्यांना र.रू.८१,८५५/- इतके अदा केले आहेत व उर्वरित र.रू.६७,४८४/- इतकी रक्कम अदा करणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४११९ विषय क्रमांक – १६
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – अ प्रभाग विद्युत
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा. विकास अभियंता यांचे जा. क्र.अप्र/वि/कावि/७१३/२०१३दि.५/०९/२०१३

मा. विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अ प्रभाग विद्युत विभागाकडील चिखली-तळवडे उपविभाग अंतर्गत चिखली परीसरात नव्याने झालेल्या दिवाबत्तीसाठी विजपुरवठा व विजमिटर घेणेसाठी र.रु.८९,९०४/- म.रा.वि.वि.कं. यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२० विषय क्रमांक – १७
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा. विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मा/शि/३/कावि/१८२/२०१३दि.४/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

माध्यमिक शिक्षण विभागाकडील क्रमिक पुस्तके खरेदीकामी मा.आयुक्त यांचेकडील आ.क्र. माध्य/शि/३/कावि/१५/२०१३ दि.१०/१६/२०१३ अन्वये मा.संचालक पाठयपुस्तक मंडळ वितरक पुणे ४ यांना १५,७६,८०३/-आगाऊ रक्कम अदा करणेस व पुस्तके आणणेकामी मुजरी व वाहतुकीसाठी आगाऊ रक्कम १०,०००/- शिक्षणाधिकारी यांचे नावे अदा करणेस आली होती. त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या १८ माध्यमिक विदयालयांस सन २०१३-१४ मध्ये मोफत क्रमिक पुस्तकांचे वाटप करणेत आले असुन वाहतुकी व मजुरी इ. खर्चासाठी रक्कम रुपये ९,८००/- इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. उर्वरित र.रु २००/- मनपा कोषागरात पावती क्र. सी/१३७६ दि. २६/०६/२०१३ अन्वये भरलेली आहे. तरी मोफत क्रमिक पुस्तके खरेदीकामी झालेला प्रत्यक्ष खर्च र.रु १५,७६,८०३/- व पुस्तके आणणेकामी मजुरी, वाहतुकीसाठी झालेला खर्च र.रु ९,८००/-यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२१ विषय क्रमांक – १८
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – जलनि:सारण
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र.जनि/२/कावि/७००/२०१३दि.४/०९/२०१३
विषय :- निविदा नोटीस क्र.५/१८/२०१२-१३ वरिल कामाचा करारनामा करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक १८ चा विचार दिनांक ८/१०/२०१३ चे सभेत करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२२ विषय क्रमांक – १९

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – वैद्यकिय मुख्य

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/१/कावि/८३३/२०१३दि.७/०९/२०१३

विषय :- साधु वासवानी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना सरावासाठी महानगरपालिकेचे भोसरी रुग्णालय व वाय.सी.एम.रुग्णालय उपलब्ध करुन देणेबाबत..

विषय क्रमांक १९ चा विचार दिनांक ८/१०/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२३ विषय क्रमांक – २०

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – वैद्यकिय मुख्य

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा. विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/१अ/कावि/९२५/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

वाय.सी.एम.रुग्णालयात सी.एम.ओ. विभागात एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिका-यांची निकड असल्याचे कळवुन त्यांना पुढील ६ महिनेमुदतवाढ देणेची शिफारस केलेली आहे. सदर रजा राखीव वैदयकीय अधिकारी यांची पदे भरणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन भरणेची कार्यवाही लवकरच करणेत येईल तोपर्यंत रुग्णालयीन कामकाजात अडथळा येऊ नये म्हणुन प्रस्तावात नमूद केलेल्या वैद्यकीय अधिका-यांना दि १०/०८/२०१३ ते दि ०९/१०/२०१३ अखेर २ महिने या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | नेमणुकीचे प्रयोजन | कामाचे ठिकाण | नियुक्ती देणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.दिपक गंगाधर पखाले | सी.एम.ओ. | वाय.सी.एम.रुग्णालय | १०/०८/२०१३ ते दि ०९/१०/२०१३ अखेर २ महिने |
| २ | डॉ.प्रमोद आनंदराव पाथरे | सी.एम.ओ. | वाय.सी.एम.रुग्णालय | |
| ३ | डॉ.शशिकांतदिनेश सोनावणे | सी.एम.ओ. | वाय.सी.एम.रुग्णालय | |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२४ विषय क्रमांक – २१

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – वैद्यकिय मुख्य

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/१अ/कावि/९२४/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

डॉ.प्रविण शर्मा यांना वायसीएम रुग्णालयात मानसेवी न्युरो सर्जन या पदावर दरमहा एकत्रित र.रु.१,०००/- या मानधनावर आदेशाचे दिनांकापासुन ६ महीने या कालावधीसाठी नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ४१२५ विषय क्रमांक – २२
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – वैद्यकिय मुख्य
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.वैद्य/१/कावि/८६६/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय विभागांतर्गत विविध टेक्निशियन, फार्मासिस्ट, नेत्रचिकित्सा अधिकारी, फिजिओथेरपिस्ट, पुरुष कक्ष मदतनीस. स्त्री कक्ष मदतनीस इ.पदे ६ महिने कालावधीसाठी भरणेकामी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३८९९, दि.१३/०८/२०१३ अन्वये भरणेकामी मान्यता देणेत आलेली होती. सदर नेमणूकांची मुदत संपुष्टात येत आहे. सद्यःस्थितीत रिक्त असलेली पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पदनाम | मानधनावर भरावयाची पदसंख्या | शैक्षणिक अर्हता/अनुभव |
|---|---|---|---|
| १ | ई.सी.जी.टेक्निशियन | १ | शासनमान्य् संस्थेकडील ई.सी.जी.टेक्निशियन कोर्स् पुर्ण् व कामाचा अनुभव आवश्यक |
| २ | लॅब टेक्निशियन | २ | बी.एस.सी., डी.एम.एल.टी. कोर्स् पुर्ण् व कामाचा अनुभव आवश्यक. |
| ३ | एक्स रे टेक्निशियन | २ | एच.एस.सी., एक्स् रे टेक्निशियनकोर्स् पुर्ण् व कामाचा अनुभव आवश्यक |
| ४ | नेत्र चिकित्सा अधिकारी | १ | एच.एस.सी., सहा. नेत्ररोग चिकित्सा डिप्लोमा उत्तीर्ण् व कामाचा अनुभव आवश्यक |
| ५ | फिजिओथेरपिस्ट | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठाचा ( फिजिओथेरपी) विषय घेऊन शास्त्र शाखेतील पदवीधर व कामाचा अनुभव आवश्यक |
| ६ | फार्मासिस्ट | १ | एस.एस.सी. पास व शासनमान्य् संस्थेकडील डी फार्म् ही पदविका उत्तीर्ण् |
| ७ | पुरुष कक्ष मदतनीस | ४ | इतर दवाखाना/रुग्णालय मधील कामाचा अनुभव आवश्यक |
| ८ | स्त्री कक्ष मदतनीस | १ | इतर दवाखाना/रुग्णालय मधील कामाचा अनुभव आवश्यक |

**दरमहा एकत्रित मानधन खालीलप्रमाणे.**

| अनुभव | ई.सी.जी, टेक्निशियन | लॅब टेक्निशियन | एक्स रे टेक्निशियन | नेत्र चिकित्सा अधिकारी | फिजिओथेर पिस्ट् | फार्मासिस्ट् | पुरुष कक्ष मदतनीस | स्त्री कक्ष मदतनीस |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० ते ३ वर्षापेक्षा कमी | ८०००/- | १००००/- | ८०००/- | ८०००/- | १२०००/- | ६५००/- | ५५००/- | ५५००/- |
| ३ ते ५ वर्षे | १००००/- | १३०००/- | १००००/- | १००००/- | १४०००/- | ६५००/- | ६२५०/- | ६२५०/- |
| ५ ते १० वर्षे | १२०००/- | १५०००/- | १२०००/- | १२०००/- | १६०००/- | ७५००/- | ६७५०/- | ६७५०/- |
| १० वर्षापेक्षा जास्त | १४०००/- | १७०००/- | १४०००/- | १४०००/- | १८०००/- | - | - | - |

वर तक्त्यात नमूद केलेली पदे ६ महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२६ विषय क्रमांक – २३

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – विद्युत मुख्य

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:- मा. विकास अभियंता यांचे जा. क्र. वि/नि/५/कावि/४०५/२०१३दि.११/०९/२०१३

मा. विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१६/२०१२-१३ मधिल अ.क्र.२ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील वेगवेगळ्या चौकात वाहतूक नियंत्रक दिव्यासाठी इनव्हेटर बसविणे व तद्अनुषंगीक कामे करणेकामी मे.रूपलक्ष्मी इलेक्ट्रीकल्स (नि.र.रु.१९,०३,८२०/- (र.रु.एकोणिस लाख तीन हजार आठशे वीस) पेक्षा १९.६०% कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आला असून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२७ विषय क्रमांक – २४

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – जेएनएनयुआरएम

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.जेएनएनयुआरएम/३/कावि/४९८/२०१३दि.१२/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मे.क्रिसील इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचे Project Monitoring & Reform Implementation Support (PMRIS) Phase - VIII करीता कामकाज करणेकामी थेट पध्दतीने तथापी कामाचा करारनामा करूनदिनांक-२८/१०/२०१३ पासून पुढील एक वर्ष कालावधी करीता दरमहा र.रु.८,८०,०००/- अधिक सेवा कर याप्रमाणे फेरनियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२८ विषय क्रमांक – २५

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – विद्युत मुख्य

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/५०४/२०१३दि.१२/०९/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/१२-१३ मधिल अ.क्र.७ अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील सबस्टेशन उच्चदाब विद्युतसंच मांडणीची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.चैतन्य इंटरप्रायजेस (नि.र.रु. १४,५१,१९१/- (र.रु.चौदा लाख एक्कावन्न हजार एकशे एक्यान्नव) पेक्षा १०.२५ % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आला असून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१२९ विषय क्रमांक – २६
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा. क्र. वि/मुका/४/कावि/५०५/२०१३दि.१२/०९/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/१२-१३ मधिल अ.क्र.८ अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील टप्पा १ ते ४ पंपगृहातील एच.टी., एल.टी. व डी.सी.पॅनेल व वीजसंच मांडणीची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे कामी मे.चैतन्य इंटरप्रायजेस (नि.र.रु.१०,९०,३९७/- (र.रु.दहा लाख नव्वद हजार तीनशे सत्यान्नव) पेक्षा १०.२५ % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आला असून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३० विषय क्रमांक – २७
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.माया बारणे
संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा. क्र. वि/मुका/४/कावि/५०६/२०१३दि.१२/०९/२०१३

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/१२-१३ मधिल अ.क्र.१२ अन्वये, मनपाच्या अ प्रभागांतर्गत वॉर्ड क्र.४९ ते ५५ अंतर्गत विकसीत दिव्यांची व विद्युत साहित्याची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ओम रेणुका इंटरप्रायजेस (नि.र.रु.९,५१,४६८/- (र.रु.नऊ लाख एक्कावन्न हजार चारशे अडुसष्ट) पेक्षा २६.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आला असून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३१ विषय क्रमांक – २८
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – ई गव्हर्नन्स
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.ई – गव्हर्न/१/कावि/८०६/२०१३दि.१०/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

ई- गव्हर्नन्स विभागाचे सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकातील "ई-गव्हर्नन्स / ई-ऑफिस" या लेखाशिर्षावरील र.रु २,७५,००,०००/- तरतूदीतून "प्रवास भत्ता "या लेखाशिर्षावर र.रु १,००,०००/- व " कर्मचारी संगणक प्रशिक्षण " या लेखाशिर्षावर र.रु १,००,०००/- तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३२ | विषय क्रमांक – २९
दिनांक – २१/९/२०१३ | विभाग – उद्यान
सुचक – मा.छाया साबळे | अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७०९/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.१ अन्वये, शंकर शेट्टी उद्यान देखभाली कामी मे.अजित स्वयं.रोज सेवा सह.संस्था मर्या. (नि.र.रु.११,०१,६६०/- (र.रु.अकरा लाख एक हजार सहाशे साठ) (वार्षिक) पेक्षा ५०.९७ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३३ | विषय क्रमांक – ३०
दिनांक – २१/९/२०१३ | विभाग – उद्यान
सुचक – मा.जगदीश शेट्टी | अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१०/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.२ अन्वये, मो.जा.क्र.६० उद्यान देखभाली कामी मे.अजित स्वयं.रोज सेवा सह.संस्था मर्या. (नि.र.रु.१७,१९,८०४/- (र.रु.सतरा लाख एकोणीस हजार आठशे चार) (वार्षिक) पेक्षा ५६.०३ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३४ | विषय क्रमांक – ३१
दिनांक – २१/९/२०१३ | विभाग – उद्यान
सुचक – मा.सुषमा तनपुरे | अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. उद्यान/६/कावि/७११/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.३ अन्वये, भक्ती-शक्ती उद्यान देखभाली कामी मे.अजित स्वयं.रोज सेवा सह.संस्था मर्या. (नि.र.रु.५,९१,८४०/- (र.रु.पाच लाख एक्यान्नव हजार आठशे चाळीस) (वार्षिक) पेक्षा ३७.८६ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३५ विषय क्रमांक – ३२
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१२/२०१३दि.११/०९/२०१३
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.४ अन्वये, साईकृष्णा मंदिर उद्यान देखभाली कामी मे.अजित स्वयं.रोज सेवा सह.संस्था मर्या. (नि.र.रु.१०,५७,२०६/- (र.रु.दहा लाख सत्तावन्न हजार दोनशे सहा) (वार्षिक) पेक्षा ५१.०७ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३६ विषय क्रमांक – ३३
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१३/२०१३दि.११/०९/२०१३
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.८ अन्वये, सखुबाई गबाजी गवळी उद्यान देखभाली कामी मे.अजित स्वयं.रोज सेवा सह. संस्था मर्या.(नि.र.रु.९,१३,५२४/- (र.रु.नऊ लाख तेरा हजार पाचशे चोविस) (वार्षिक) पेक्षा ४९.०० % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३७ विषय क्रमांक – ३४
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१४/२०१३दि.११/०९/२०१३
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.१० अन्वये, थेरगांव बोटक्लब उद्यान देखभाली कामी मे.अजित स्वयं.रोज सेवा सह.संस्था मर्या. (नि.र.रु.१२,१६,९२०/- (र.रु.बारा लाख सोळा हजार नऊशे वीस) (वार्षिक) पेक्षा ४७.०७ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३८ विषय क्रमांक – ३५

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान

सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१५/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.११ अन्वये, संत सावतामाळी (वाकड) उद्यान देखभाली कामी मे.अजित स्वयं.रोज सेवा सह. संस्था मर्या. (नि.र.रु.१४,७३,३८४/- (र.रु.चौदा लाख त्र्याहत्तर हजार तीनशे चौ-यांऐंशी) (वार्षिक) पेक्षा ५०.७७ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१३९ विषय क्रमांक – ३६

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१६/२०१३दि.११/९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.५ अन्वये, सर्पोद्यान व पक्षालय उद्यान देखभाली कामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन (नि.र.रु. १०,३५,७२०/- (र.रु.दहा लाख पस्तीस हजार सातशे वीस) (वार्षिक) पेक्षा ३५.१९ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४० विषय क्रमांक – ३७

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान

सुचक – मा. विनया तापकीर अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१७/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.६ अन्वये, शिवाजी पार्क उद्यान देखभाली कामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन (नि.र.रु. ९,४९,७५४/- (र.रु.नऊ लाख एकोणपन्नास हजार सातशे चोपन्न) (वार्षिक) पेक्षा ३५.१९ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४१ विषय क्रमांक – ३८
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.माया बारणे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१८/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.११/२०१२-१३ मधिल अ.क्र.७ अन्वये, विर सावरकर उद्यान (प्रेमलोकपार्क) देखभाली कामी मे.तावरे कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.३,६८,२५६/- (र.रु.तीन लाख अड्डुसष्ट हजार दोनशे छपन्न) (वार्षिक) पेक्षा ३०.०९ % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४२ विषय क्रमांक – ३९
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७१९/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.१४/२०१२-१३ मधिल अ.क्र.६ अन्वये, नाना नानी पार्क उद्यान देखभाली कामी मे.साईकृपा सर्व्हिसेस (नि.र.रु. ४,७३,९७६/- (र.रु.चार लाख त्र्याहत्तर हजार नऊशे शहात्तर) (वार्षिक) पेक्षा २२.०० % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४३ विषय क्रमांक – ४०
दिनांक – २१/९/२०१३ विभाग – उद्यान
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.उद्यान/६/कावि/७२०/२०१३दि.११/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.१४/२०१२-१३ मधिल अ.क्र.५ अन्वये, तळवडे पॉलीपाऊस प्रकल्प देखभाली कामी मे.भैरवनाथ इंटरप्रायजेस (नि.र.रु. ७,५२,६४०/- (र.रु.सात लाख बावन्न हजार सहाशे चाळीस) (वार्षिक) पेक्षा ३०.०० % कमी) ही सर्वात कमी दराची निविदा स्विकृत करणेत आली असून करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला आहे. प्रस्तुत कामी ३ वर्षासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४१४४ विषय क्रमांक – ४१
दिनांक – २१/९/२०१३
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

मा.अधिष्ठाता,बी.जे.मेडिकल कॉलेज,ससून रुग्णालय यांचेकडील दि.१६/०९/२०१३ रोजीचे पत्रान्वये त्यांनी महानगरपालिकेकडे I.V.Normal Saline 0.9% 500ml Bottle = 5000 Bottles व I.V.Metronidazole 500mg/100ml Bottle = 5000 Bottles या औषधांची मागणी लोन बेसिसवर केलेली आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे सदर औषधांचा साठा उपलब्ध असल्यामुळे ससुन रुग्णालयासाठी उक्त औषधे लोन बेसिसवर उपलब्ध करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४५ विषय क्रमांक – ४२
दिनांक – २१/९/२०१३
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४६ विषय क्रमांक – ४३
दिनांक – २१/९/२०१३
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.अरुणा भालेकर,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समिती ठराव क्र.२०३४ दिनांक १/१२/२०१२ मधील ३६.९९ % कमी हा मजकुर वगळण्यात यावा व त्याऐवजी ३१.९९ % कमी हा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४७ विषय क्रमांक – ४४
दिनांक – २१/९/२०१३
सुचक – मा. शकुंतला धराडे अनुमोदक – मा. अरुणा भालेकर
संदर्भ:- मा. शकुंतला धराडे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव..

ब प्रभागातील सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४८ विषय क्रमांक – ४५

दिनांक – २१/९/२०१३

सुचक – मा. अरुणा भालेकर अनुमोदक – मा. शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर,मा. शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३६,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१४९ विषय क्रमांक – ४६

दिनांक – २१/९/२०१३

सुचक – मा. शकुंतला धराडे अनुमोदक – मा. अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.शकुंतला धराडे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव..

महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ चे अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावा सोबतच्या तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५० विषय क्रमांक – ४७

दिनांक – २१/९/२०१३

सुचक – मा. अरुणा भालेकर अनुमोदक – मा. शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.अरुणा भालेकर, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

मा.स्थायी समिती ठराव क्र.३९२७ दि.२७/०८/२०१३ रद्द करण्यात यावा व मा.आयुक्त यांचे डॉकेट क्र.काशा/०४/कावि/४९६/२०१३ दिनांक ६/०८/२०१३ प्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५१ विषय क्रमांक – ४८

दिनांक – २१/९/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा. माया बारणे अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मभां/५/कावि/७०४/२०१३दि.१३/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागांसाठी एच.पी.कं.चे टोनर खरेदीकामी केलेले Toner No – Q36A - 200 व Toner No – 05A.(505CE) 600 नग चे दर ई नि.सु.क्र.०३/०१/२०१२ – १३ नुसार (बाब क्र.१७) प्रती नग र.रु.४११६/- प्रमाणे २०० नगांसाठी एकुण र.रु.८,२३,२००/- व (बाब क्र.४२) प्रती नग र.रु. ५४६८/- प्रमाणे ६०० नगांसाठी र.रु. ३२,८०,८००/- असे एकुण ६०० नगांसाठी एकत्रित र.रु.४१,०४,००० /- एवढा खर्च अपेक्षीत आहे. ई-गर्व्हनन्स विभागाकडील Toner No – Q36A व Toner No – 05A (505CE) मागणी विचारात घेता यापुर्वीचे ई- नि.क्र.०३/०१/२०१२-१३ अन्वये प्राप्त लघुतम दरानुसार मे.फॅन्सी कॉम्प्युटर्स् आणि पेरीफेरल्स यांचे कडुन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्च र.रु.४१,०४,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५२ विषय क्रमांक – ४९
दिनांक – २१/९/२०१३ विभाग - दूरसंचार
सुचक – मा.जगदीश शेट्टी अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे जा. क्र. दूरसंचार/३/कावि/८६/२०१३दि.११/०९/२०१३

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दूरसंचार विभागाचे “मनपा विविध विभागाकरिता वायरलेस यंत्रणा उभारणे” व “मनपा मुख्यालयात आपतकालीन माहिती यंत्रणा उभारणे” या लेखा शिर्षावरील प्रत्येकी र.रु.६,००,०००/- एवढी रक्कम दूरसंचार विभागाचेच' “विविध अग्निशामक केंद्रे येथे वायरलेस यंत्रणा उभारणे व विविध पाणी पुरवठा केंद्रे येथे वायरलेस यंत्रणा उभारणे” या लेखा शिर्षावर वर्ग करणे आवश्यक असल्याने त्यास तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५३ विषय क्रमांक – ५०
दिनांक – २१/९/२०१३
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ - मा.आशा शेंडगे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

स्थापत्य 'क' प्रभागात करावयाचे कामाचे तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५४ विषय क्रमांक – ५१
दिनांक – २१/९/२०१३ विभाग - करसंकलन
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. कर/१/कावि/१५३८/२०१३दि.१६/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मिळकत सर्व्हेक्षणाशी संबंधित प्राप्त झालेल्या माहितीची डेटा एन्ट्री करण्यासाठी मे.शुभम उद्योग यांचेकडुन र.रु. ७६६३/- प्रति माह प्रति संगणक ऑपरेटर या पुर्वीच्याच दराने व पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार १५ विभागीय कार्यालयासाठी १५ संगणक ऑपरेटर घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५५ विषय क्रमांक – ५२
दिनांक – २१/९/२०१३
सुचक – मा.सौ.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ :- मा.सौ.सुषमा तनपुरे,मा.संगिता भोंडवे यांचा प्रस्ताव..

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३ – १४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील एकुण ०९ कामांना कमी तरतुद असलेमुळे या कामांची देयके अदा करता येत नाही. तरी सन २०१३ – १४ च्या मुळ अंदाजपत्रकातील अशा कमी तरतुद असलेल्या कामांस रक्कम रु.

४३,००,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतुद असलेल्या तसेच नवीन कामामध्ये होणा-या बचतीमधुन प्रस्तावासोबत जोडलेल्या यादीप्रमाणे तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. अ प्रभागातील सन २०१३ – १४ चा मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विषयक विकास कामाच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.४३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५६ विषय क्रमांक – ५३

दिनांक – २१/९/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.सौ.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.चंद्रकांत वाळके,मा.सौ.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३ – १४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. .(वाढ/घट र.रु.२५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५७ विषय क्रमांक – ५४

दिनांक – २१/९/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.सौ.सुषमा तनपुरे

संदर्भ – मा.चंद्रकांत वाळके,मा.सौ.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व नगरसदस्य यांना मानधनात वाढ करण्यात यावी. दरमहा सभेसाठी नगरसदस्य यांना २५,०००/- (पंचवीस हजार फक्त) एवढे मानधनात वाढ करण्याबाबतचा ठरावास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापा लिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१५८ विषय क्रमांक – ५५

दिनांक – २१/९/२०१३ विभाग - दूरसंचार

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ - मा.अति. आयुक्त यांचे जा. क्र. दूरसंचार/६/कावि/४९/२०१३दि.१७/०९/२०१३

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वेगवेगळया दवाखान्यामध्ये सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने सि.सि.टि.व्ही.सर्व्हेलन्स यंत्रणा लावणेसाठी नुकतेच मा.स्थायी समिती सभेने मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र शासनाचे आय.टी. सेक्रेटरी (Director of Information Technology) यांनी निश्चीत केलेल्या गाईड लाईन्स प्रमाणे सि.सि.टि.व्ही कॅमेरे बसविणेसाठी, योग्य मॉडेल निवडणेसाठी तसेच कॅमे-यांची तांत्रीक तपासणी करणेसाठी M/s Sony, M/s Axis व M/s Bosch etc. प्रख्यात कंपन्यांनी प्रत्यक्ष उभारणी केलेल्या ठिकाणांना /त्यांचे सर्व्हिस लॅबला भेट देऊन माहिती घेणेबाबत विचारणा केली असता M/s BOSCH यांनी बेंगळुर व M/s Axis यांनी चेन्नई येथील कार्यालये/शासकीय इमारतींवर बसविलेल्या सि.सि.टि.व्ही. सर्व्हेलन्स यंत्रणेची पाहणी करणेसाठी व माहिती घेणेसाठी आमंत्रित केले आहे. त्यामुळे सदर ठिकाणी भेट देवुन माहिती घेणे आवश्यक आहे. त्यासाठी

१) श्री.थॉमस नरोन्हा, वायरलेस इनचार्ज
२) श्री.उदय जरांडे, सुरक्षा अधिकारी
३) श्री.गोपाळ चिंचवडे, कार्यकारी अभियंता (वि)
या अधिका-यांस बेंगळुर व चेन्नई येथे विमानाने जाणे येणेसाठी व त्यापोटी येणा-या संपुर्ण खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/ ८९४ /२०१३
दिनांक - २५/०९/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.